# गणेश दर्शन



मौलाली चौक रोड येथील सिहंगर्जना मंडळाची १८फुटी उंचीची गणेश मूर्ती.



सोन्या मारूती गणेश मंडळाची मूर्ती.



लकी चौकातील श्री समर्थ गणपतीची मूर्ती.



हत्तुरे वस्ती येथील महागणपती मंडळाची १४ फूटी गणेशाची मूर्ती.



आदर्श नवरात्र महोत्सव मंडळ, आदर्श प्रतिष्ठान



श्री स्वस्तिक मित्र मंडळ, जुना विडी घरकुल



पत्रा तालीमची गणेश मूर्ती.



पाणीवेस तालीमची गणेश मूर्ती.

## महात्मा फुले गणेशोत्सव मंडळातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन

वेळापूर/प्रतिनिधी

वेळापूर ग्रामपंचायत परिसर येथील श्री क्षेत्र महात्मा फुले गणेशोत्सव मंडळातर्फे गणेशोत्सव सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २९ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता सत्यनारायण महापूजा कार्यक्रम, सकाळी आकरा वाजता गजी ढोल कार्यक्रम संपन्न होऊन, दुपारी बारा वाजता राजकुमार शिंदे यांच्यावतिने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दिनांक ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी सात वाजता आर्ट ऑफ लिविंग सत्संग कार्यक्रम होणार आहे. रविवार ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ९:०० वाजता चित्रकला स्पर्धा होणार आहे. सकाळी ११ वाजता रांगोळी स्पर्धा चे आयोजन करण्यात आले आहे. लहान गट १ ली ते ४ थी पहिल्या तीन क्रमांकास शालेय साहित्य बक्षिस दिले जाणार आहे. मध्यम गट ५ वी ते ८ वी पहिल्या तीन क्रमांकास आकर्षक बक्षीस तर मोठा गट ९ वीच्या पुढे प्रथम क्रमांक पैठण साडी, द्वितीय क्रमांक सिल्क साडी, तृतीय क्रमांक सिल्क साडी असे बक्षीस ठेवण्यात आली आहेत. सोमवार १ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजता आनंद मूर्ती भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम होणार आहे. २ सप्टेंबर रोजी सकाळी आकरा वाजता सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण व स्वच्छता अभियान कार्यक्रम होणार आहे . ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजता भव्य रेकॉर्ड डान्स स्पर्धा लहान गट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथम बक्षीस ३००१ रुपये, दुसरे बक्षीस २००१ रुपये, तिसरे बक्षीस १००१ रुपये बक्षिस असे ठेवण्यात आले आहे. ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजता रेकॉर्ड डान्स स्पर्धा लहान गट व शो डान्स मोठा गट कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजता महाआरती व बक्षीस वितरण सोहळा कार्यक्रम संपन्न होणार आहे. सहा सप्टेंबर रोजी सायंकाळी चार वाजता श्री ची भव्य मिरवणूक व विसर्जन सोहळा होणार आहे. या सर्व कार्यक्रमांना भाविकांनी, स्पर्धकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मंडळाचे मार्गदर्शक शंकरराव काकुळे, मंडळाचे अध्यक्ष राजकुमार पोरे, खजिनदार तुकाराम राऊत, कार्याध्यक्ष विलास राऊत, उपाध्यक्ष राजू तेली, सचिव शंकर राऊत यांनी केले आहे.


## आवक वाढल्याने दर कोसळले

## लालभडक टोमॅटो व्यापाऱ्यांनी टाकले रस्त्यावर

सोलापूर/प्रतिनिधी

टमॅटोला प्रति किलो रुपये तर ३५ ते ४० रुपये दर मिळत असल्याने टोमॅटो उत्पादक शेतकरी आणि विक्रेत्यांनी टोमॅटो रस्त्यात फेकून निघून जात आहे.

सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दररोज ५० ते ६० टन टोमॅटोची आवक होत आहे.किरकोळ प्रतिच्या लांब, हिरवा आणि पिवळे, डाग पडलेले टॉमटोला प्रति किलो २ ते २:५० रुपये तर उत्तम प्रतीचा लाल भडक, आकारांनी गोल, लाल रंग असलेला माल ५ ते ६ रुपये किलोच्या दराने खरेदी केली जात आहे. सोलापूर शहर परिसरातील मार्केट मध्ये हेच टोमॅटो १० ते २० रुपये किलोने विक्री होत आहे. योग्य दर न मिळालेला टोमॅटो आहे त्या स्थितीत शेतकरी, आणि व्यापारी टाकून जात आहे. एकीकडे आवक जास्त होत असल्याने दर कोसळत आहेत. तर दुसरीकडे सतत पाऊस पडत असल्याने शेतातील फळ भाजी, भाजी- पाला जागेवरच खराब होत आहे. तर दुसरीकडे उत्पादन केलेल्या फळ भाजी मधील टोमॅटो, कोबी, फ्लावर इतर, भाजीपाला मधील मेथी, शेपू, चुका, पालक, कोथिंबर याला दर मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.




“सतत पाऊस पडत असल्याने मेथी, शेपू अशी भाजीपाला जागेवर सडून जात आहे. विक्रीसाठी काढली असता प्रति पेंढी २ ते ३ रुपये दर मिळत आहे. शेकडा २०० ते २५० मिळत आहे.दर परवडत नसल्याने जागेवरच सोडून जाण्याची वेळ आली आहे.

**–भागवत लामतुरे, शेतकरी– तेलगाव**


“मार्केटमध्ये टोमॅटो, फ्लावर, कोबी, शेवगा अशी फळ भाज्याची आवक जास्त होत आहे. सतत पाऊस पडत असल्याने मागणीत घट होत आहे. भाजीपाला ५ रुपये पेंडी, तर फळ भाज्या १० ते १५ रुपये नग असून देखील ग्राहक घेत नाहीत. शेतकरी, व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे.

**–समीर शेख, भाजी विक्रेता–सत्तर फूट रोड**

## मोहोळच्या बाजारपेठेत महिलांची गर्दी; गौराईला लागणाऱ्या साहित्य खरेदीसाठी झुंबड

मोहोळ/प्रतिनिधी

गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात झालेल्या बाप्पाच्या आगमनापाठोपाठ आता आली आली गौराई सोन्यारुनपाच्या पावलानं असे म्हणत रविवारी सोनपावलांनी माहेरवाशीण जेष्ठा गौरींचे आगमन होणार आहे. त्या गौराईसाठी लागणाऱ्या वस्तूंच्या खरेदीसाठी मोहोळच्या बाजारपेठेत शहरांसह ग्रामीण भागातील महिलांनी गर्दी केल्याचे दिसून येत आहे.



मोहोळच्या बाजारपेठेत गौरींचे मुखवटे, स्टॅण्ड, सुंदर भरजारी आकर्षक साड्या, ओवसा भरण्यासाठी सुवासिनींना लागणारी सूप खरेदी करण्यासाठी महिलांची एकच गर्दी झाली आहे. गौरींच्या सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्यासह दागिने, ओटीचे सामान ब गौरींचे आकर्षक देखणे मुखवटेही उपलब्ध झाले आहेत. यामध्ये चेहऱ्यापासून ते कमरेपर्यंतचे मुखवटे सुध्दा आहेत. त्याचबरोबर लाकडी व लोखंडी स्टॅण्डच्या विविध डिझाईन, उभ्या व बैठ्या सुंदर गौरीच्या मुर्ती बाजारात सुध्दा आहेत. विशेष म्हणजे गौरींसाठी विविध प्रकारचे दागिने देखील मिळत आहेत. ठिकठिकाणच्या मुख्य रस्त्याच्या कडेला दागिन्यांचे स्टॉल मांडले आहेत. मोत्यांचे शुभ्र दागिने, कोल्हापुरी साज, ठुशी, नथ अशा पारंपरिक दागिन्यांच्या खरेदीसाठी महिलांनी बाजारात गर्दी केली आहे.

यंदा मोत्यांचे व चांदीच्या रंगाच्या दागिन्यांची चलती आहे. पूजा साहित्यासह गौराईच्या साडी खरेदीलाही मोठ्या प्रमाणात मागणी आहे. सर्वात महत्त्वाचा मान म्हणून गौरी पुजेसाठी सुपामध्ये ओवसा भरण्याची पद्धत आहे. यासाठी सूप पण खरेदी करण्यात येत असून १२० रुपयांपासून ते ३०० रूपयांपर्यंत सुपांच्या आकार व दर्जा यानुसार किमती आहेत.

बाजारपेठेत सजावट केलेल्या गौराईच्या मुर्तीवर हिरे, कुंदनाच्या दागिन्यांचा साज आहे. त्यामुळे या मुर्ती खुपच देखण्या दिसत आहेत. गौरींसाठी माळ, कानातले, मोत्यांचे, फुलांचे हार आणि या हारांना मध्यभागी मोठे पदक, हिरव्या पानांचे हार, आणि पदकाच्या जागी आंबा, सफरचंद, संत्री या फळांचे पदक असे हार बाजारात आले आहेत. याशिवाय महालक्ष्मीच्या साड्या, कपडे यांचे असंख्य प्रकार सुध्दा बाजारात उपलब्ध झाले आहेत.

### गौरींचे मुखवटे ५०० रुपयांपासून उपलब्ध

गौरींचे विविध प्रकारचे मुखवटे बाजारात उपलब्ध झाले असून त्यांच्या किमती सुध्दा ५०० रुपयांपासूनच्या पुढे आहेत. मुखवटे खरेदीसोबतच मंगळसूत्र, विविध प्रकारचे हार, माळा, जोडवी, बांगड्या, नथ, अशा पारंपरिक दागिन्यांसह विविध प्रकारच्या साड्या देखील खरेदी करताना महिला वर्ग मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

कार्यालय

**जिल्हा वक्फ अधिकारी, सोलापूर**

दारुल सल्लाम बिल्डींग, सिध्देश्वर पेठ, सोलापूर-४१३००१

संचिका क्र. ६९/-/२०२५ क्र.वक्फ-जिवअ/चौकशी-/२६६/२०२५

**(जाहीर प्रगटन)**

**उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.**

**वक्फ संस्थेच नाव व पत्ता : जिनतूल इस्लाम अरबी मदरसा, मोहोळ,ता.मोहोळ, सोलापूर**

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री. अब्दुल रझाक खलीललूर रहमान सुर्खी दिनांक. २६.०६.२०२५ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा/जिल्हा वक्फ अधिकारी धाराशिव कडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ अजीवन वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित उर्वरित विश्वस्त नविन विशवस्तांची नेमणुक करतील अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | खाजाबक्ष फकरुद्दीन शेख | अध्यक्ष |
| २ | अब्दुल रझाक खलीलतूर रहमान सुर्खी | उपाध्यक्ष |
| ३ | महंमद झुबेर अय्युब शेख | सचिव |
| ४ | नजीर अब्दुल्ला शेख | सहसचिव |
| ५ | मुस्ताक रहिमबक्ष बागवान | खजिनदार |
| ६ | बशीर फक्रुद्दीन बागवान | सदस्य |
| ७ | अल्लाअमीन लालमोहम्मद बागवान | सदस्य |
| ८ | तैय्यब अब्दुल मजीद शेख | सदस्य |
| ९ | अ.गफुर म. इस्माईल पटेल | सदस्य |
| १० | अशपाक अब्दुल मिर्झा | सदस्य |
| ११ | सत्तार महिबूब बागवान | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, दारुल सल्लाम बिल्डींग, सिध्देश्वर पेठ सोलापुर येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

शिक्का

**सही/-**
**(फरदीन काझी)**
**जिल्हा वक्फ अधिकारी, सोलापुर**